# साक्रेटिस

## आणि

# आगरकर.

जून १७ १९३३

लेखकः—

पु. पां. गोखले.

कऱ्हाड.

# साक्रेटिस आणि आगरकर.

" निस्पृहस्य तृणं जगत् "

अनियंत्रित सत्ताधारी समुद्रापेक्षांही लहरी असतो अशी लौकिक समजूत आहे, पण इतिहास त्याच्यापेक्षांही लहरी आहे. केलेलेंच करण्यांत, गिरवलेलेंच गिरवण्यांत, आणि झालेल्याची उजळणी म्हणण्यांत त्याला लहान मुलाच्यावर मौज वाटते. प्रसंगानुसार मांडणीमोडणींत डोळ्यांत भरण्यासारखा फरक असतो ही गोष्ट खरी, पण मार्मिक नजरेला समान रंगाचे किरण प्रतीत झाल्याशिवाय रहात नाहींत. आत्मप्रतिष्ठेंत तल्लीन असणाऱ्या इतिहासाच्या ह्या बाललहरींचा आस्वाद सुखसंवेदक आणि उद्बोधक असतो; नाहींतर, 'तौलनिक अभ्यास' हा शब्दप्रयोग तरी कोठून अस्तित्वांत येता ?

अभ्यासू मनाच्या तौलनिक चष्म्यापुढें, आगरकरी वातावरणाच्या कडयांत समान्तर चमकेच्या प्रभावळींत साक्रेटीस वावरतो तो तरी, घेतलेलीच चक्कर पुन्हा घेण्याच्या इतिहासाच्या लहरीमुळेंच. ख्रिस्तपूर्व पांचव्या शतकाच्या मध्यावर जन्मलेला ग्रीक साक्रेटीस आणि ख्रिस्ती सनाच्या एकोणी-

साऱ्या शतकाच्या उत्तरार्धांत जगांत येणारे व वावरणारे महाराष्ट्रीय आगरकर यांच्यांत विलक्षण साम्य आढळावें हें केवढें आश्चर्य ! वृत्ति, परिस्थिती, कर्तबगारी, कार्य– कोणत्याही टेकावरून टेहळणी केली तरी, सव्वादोनहजार वर्षांच्या अंतरानें उगवलेल्या या ग्रीक आणि महाराष्ट्रीय तारकांवर समान गोडीचे सुधांशु झळकतांना दिसतात; इतकें कीं, दरेकाची खास लज्जत निराळी असली तरी ती मनाची पकड तितकी करीत नाहीं.

तथापि केसाचा कीस काढण्याइतकें बारीक बघणाऱ्या चिकित्सेला त्याचें काय होय ? सागरमाप सारखवटपणांतूनसुद्धां निराळी झांक मारणारें पाणी किरण साधून बसणाऱ्या चिकित्सेच्या तडाक्यांतून सुटत नाहीं. मग साक्रेटिस—आगरकरांबाबत काय विचारावें ? डोळे चोळून मर्मभेद केला असतां तेथें निशाण्याच निरनिराळ्या दिसतात. महाकवि शेक्स्पीअरप्रमाणेंच ग्रीक तत्ववेत्ता साक्रेटीस यांचें नांव जगांतील कोणत्या देशास ठाऊक नाहीं ? पहिल्याच्या नाट्यसृष्टीप्रमाणें दुसऱ्याच्या तत्त्वज्ञानाचा आस्थापूर्वक अभ्यास सर्वत्र होत नाहीं,

किंबहुना साक्रेटिसाच्या तत्त्वज्ञानाची तोंडओळख ही क्वचितच असते; तथापि त्या महाभागाचें नांव सर्वत्र दुमदुमतें आहे. हें नुसतें नांवाचें वैभव तरी आगरकरांच्या नशिबीं कोठें आहे? साक्रेटिसासारखा ' चिंतामणी । दैवें लाधला आपणालागुनी ' अशी प्रचीति खुद्द ग्रीस देशाला आणि जगाला झेनाफन व प्लेटो यांच्या साक्रेटिसविषयक ग्रंथांनीं केली आणि त्या तत्त्ववेत्त्याच्या कीर्तिरूप आक्रोडाचें बीं त्याच्या मरणोत्तरच रुजलें, वाढीस लागलें, व वृक्षरूप आणि विस्तार पावलें हें कबूल! त्याच निकषावर आगरकरी नाणें खणखणेल, ही अपेक्षाही वावगी नाहीं. पण चिकित्सेचें गणित तशी कुंडली तयार करीत नाहीं त्यास नाइलाज आहे. आगरकरांबद्दलच्या अवास्तव कल्पना धरणीकंपासारख्या दुभंग होत चालल्या आहेत, त्यांच्या विवेकप्रधान सुधारणेचें पाऊल पुढें पडत आहे, पंडित आण्णासाहेब कर्व्यांसारख्यांनीं त्यांची परंपरा उज्वल राखली आहे, प्रमुख गो. चि. भाटयांसारखे अधिकारी शिष्यवर आगरकरांवर मनोहर व सर्वमान्य ग्रंथ लिहितील. पण साक्रेटिसाप्रमाणें आग-

रकरांचें नांव जगभर फडकेल असें दिसत नाहीं. दोघेही क्रांतिकारक खरें, पण तत्त्वज्ञानाचा— पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाचा मूळ प्रणेता म्हणून दुनियेच्या दरबारांत साक्रेटिसाला जो मान आहे, तसा पटकावण्यासारखें आगरकरांच्या बाजूस काय आहे ? नाहीं म्हणावयास, " स्वार्थो यस्य परार्थ एव स पुमान् एकःसतामग्रणीः " या दृष्टीनें आगरकरांचें नांव साक्रेटिसाच्या मालिकेंत झळकेल, पण साक्रेटिसाच्या वैशिष्टयामुळें त्याला व ग्रीसला जो गौरव, तो आगरकरांच्या व त्यांच्याद्वारां महाराष्ट्राच्या वाटयाला नाहीं; कारण दुनियेच्या दाखलदारींत आगरकरांचें ' आपलेंपण ' म्हणून कांहीं नाहीं.

पण प्रत्येक ग्रहाला सूर्याइतकी व्यापक कक्षा कोठून येणार ? रंगभूमीवर सगळ्याच पात्रांना राजाचा पोशाख मिळत नसतो. तत्रापि ' प्रजानुरंजनांतील राजेपण ' प्रत्येकाच्या हातीं असतें. या दृष्टीनें पाहतां आगरकरसाक्रेटिसांची तुलना होते खरी ! तीमधील पंक्तिप्रपंचसुद्धां डोळेझांक करण्याइतका क्षुल्लक नाहीं; तथापि स्वदेशविषयक

कळकळीच्या आणि स्वजनसेवेच्या वेदीवर दोहों-सही परिणामाच्या अक्षदा सारख्याच वाटयाला येतात.

परिस्थितीच्या फलकावर साक्रेटिस-आगरकरां-कडे पाहिलें तर मनोरंजक देखावा दिसल्यावांचून राहत नाहीं. समाजांतील उच्चनीच भावनेच्या कक्षेंत साक्रेटिस जन्मानें आगरकरांच्या इतका वर लागत नाहीं. तथापि पाषाणमूर्तिकार साफ्रोनिस्कस आणि सुईण फेनारिती यांनीं आपला मुलगा साक्रेटिस याला आपल्या हातीं धरून इतका चालवला होता कीं वडिलांचें वळण साक्रेटिसाचें हातीं चांगलें बसलें होतें. दुसऱ्याच्या मनांतील विचार वदवण्यांत साक्रेटिसानें आईचें 'सुईणपण' उचललें होतें आणि बापाचा पाथरवटी हातोडा त्याच्या हातीं असा बसला होता कीं पाजेनियस राजाच्या वेळीं अथेन्स-मध्यें गाजत असलेल्या मर्क्युरी व ग्रेसच्या मूर्ती साक्रेटिसच्या होत अशी ख्याति आहे. व्यवहा-राच्या अंगणांत आईबापांच्या बोटाला धरून "चाल चाल माते" आगरकरांनीं केलेंच नाहीं झटलें तरी चालेल आणि वडिलांप्रमाणें त्यांनीं

कधीं पुराण सांगितलें नाहीं कीं कीर्तन केलें नाहीं. तथापि कवयित्री आईची रसिकता व निष्ठा आणि वडिलांची वर्णनशैली आगरकरांनीं आत्मसात् केली होती. वडिलार्जित दोनएक हजारांचा कुणगा साक्रेटिसाच्या हातीं लागून तो तुकारामाप्रमाणें त्यानें उडविला; पण तशी अगर तशा पंखीं माया आगरकरांकडे वाहिली नसतांनासुद्धां त्यांना साक्रेटिसाइतकाच आपल्या जन्मदात्याबद्दल आदर होता.

शिक्षणाच्या वळणावर वर मान करून पाहिलें तर साक्रेटिसाची पहिली व्यावहारिक दिशा बदलून त्यानें ज्योतिष, सिद्धपदार्थविज्ञानशास्त्र वगैरेंचा अभ्यास केला तर आगरकरांचें नाटक मागील अंकावरूनच पुढें चालूं राहिलें. सरस्वतीचा हा उत्सव साक्रेटिसाबाबत केतोनें व आगरकरांबाबत नागपूरकर मुनसफांनीं साजरा केला. लोकशिक्षणाचें कार्य दोघांनींही केलें, पण एकानें तुफान्याच जिभेचा पट्टा चालवून, तर दुसऱ्यानें शाळेंत जीभ व वृत्तपत्रांत लेखणी यांचा उपयोग करून.

घरगुती वर्तुळांतसुद्धां हेच रंग भरलेले आढळतात. साक्रेटिसाची गृहिणी जांतपी ही त्राटिकेची

पूर्वकल्पना विधात्यानें उत्पन्न केली होती की काय देव जाणें ! ' गृहिणी गृहमुच्यते ' हें यशोदाबाई आगरकरांनीं सार्थ केलें, तो मगदूर जातपींचा नव्हता. शिवाय मिरतो नांवाचें आणखी एक कुटुंब साक्रेटिसाचें होतें असा लोकप्रवाद क्वचित् ऐकूं येतो. साक्रेटिसाला जडलेलें ' तात्त्विक वेड ' त्याच्या संसारविषयक उदासीनतेला कारण झालें असेल, पण दोन बायकांचे दादलेपण आणि त्यांतही जातपीची ' चंडी ' प्रकृती कमी जबाबदार गणतां येत नाहीं. खुद्द गोपाळराव आगरकरही साक्रेटिसाइतकेच संसाराविषयीं विरक्त होते; पण ते तयार झालेल्या मनोधैर्यामुळें. तथापि आपल्या संसाराविषयक कर्तव्यांत आगरकरांनीं कधींच कसूर केली नाहीं, हें लक्षांत ठेवणें जरूर आहे.

शिवाय वातावरणांतही तोच प्रकार आढळतो. स्वतंत्र लोकसत्तेखालीं नांदणाऱ्या ग्रीस देशाचा नागरीक साक्रेटिस प्रसंगानुसार न्यायदानासाठीं पंच बनू शके, आणि प्रसंगोपात स्वदेशाच्या सेवेसाठीं रणांगणावर तलवार गाजवावयासही जाई. आगरकरांचा महाराष्ट्र निःशस्त्र होऊन आंग्लाईच्या

ठोकरी खालीं चुरडला असतां, न्यायदानासाठीं सरकारी सहीशिक्यानिशीं लोकमतानुवर्ती 'पंचत्व' पावणें अगर धारातीर्थी नांव गाजविणें शक्यतेच्या आत्यंतिक टोंकावर होतें.

दक्षिणोत्तर ध्रुवाइतपत एकमेकांकडे पाठ फिरवून बसलेल्या अशा व्यक्तिविषयक परिस्थितींत, त्यांना ज्या मैदानावर काम करावयाचें होतें, तीं अगदीं सारखीं होतीं. जेथें तेथें अज्ञानाचीं अभ्रें दाटून राहिलीं होतीं; तोऱ्याचा, घमेंडीचा काळोख दाटून राहिला होता; वडिलांच्या विहिरींचें पाणी खारें असलें तरी तें गोड म्हणण्याइतका समाज 'कापुरुष' बनला होता; आपण आहोंत कोठें, आपला धर्म काय याची जाणीव जागती नव्हती. बळी तो कानपिळी होऊन बेबंदशाहीचा धुमाकूळ चालला होता. तोंडदेखलेपणा— तोंडपूजेपणा सर्वत्र बोकाळला होता. स्वार्थाचें साम्राज्य होऊन परार्थांतील परमार्थ परागंदा झाला होता.

हे पेच उकलावयास लोकशिक्षणाशिवाय दुसरी किल्ली कोठली? आगरकरसॉक्रेटिसांनीं तीच हाताशीं धरली. झालेल्या, बनलेल्या, निढावलेल्या लोकांच्या

वाटे ते गेले नाहींत; तर होऊं घातलेल्या आणि बनूं पाहणाऱ्या व उमलणाऱ्या मंडळींवरच त्यांनीं आपली भिस्त ठेवली. वादपटुत्वाच्या नाना तऱ्हा कारणीं लावून " जेथें जेथें येईल संधि " तेथें तेथें " जें जें कांहीं आपणास ठावें । तें तें हळूहळूं शिकवावें ॥ शहाणे करून सोडावें । सकळ जन ॥ " हा समर्थधंदा साक्रेटिसआगरकरांनीं चालवला होता. " ज्याप्रमाणें ' पिछेसे आई ' या तत्त्वाचा साक्रेटिसानें निषेध केला, त्याप्रमाणें ' बाबावाक्यं प्रमाणम् ' चा आगरकरांनीं उच्छेद केला. प्रत्येक बाबतींत हें का व कसें, याची जाणीव साक्रेटिसानें तरुण पिढींत उत्पन्न केली, त्याप्रमाणें आगरकरांनीं विचाररहित रूढींवर हल्ला करून लोकांना आपल्या संस्कृतीबद्दल विचार करावयाला लावलें.... ज्याप्रमाणें साक्रेटिसानें भोळसरपणाच्या पारलौकिक ध्येयापासून लोकांना पराङ्मुख करून ऐहिक संसारांतल्या ध्येयाकडे लोकांचें लक्ष वेधलें, त्याच-प्रमाणें आगरकरांनीं वेड्या धार्मिक कल्पनांपासून लोकांना सोडवून त्यांना आपल्या ऐहिक उन्नतीच्या मार्गावर आणलें. "

लोकशिक्षणाचें असलें कार्य साक्रेटिसानें चाळीस वर्षें केलें आणि आगरकरांनीं फक्त पंधरा वर्षेंच केलें; पण त्यांत समान वैशिष्टय असें कीं दोघांचें हें कार्य भवितव्यतेनें अशक्यतेच्या मोहोर करीपर्यंत सारखें चाललें होतें. त्याचा परिपाक शिष्यप्रेमरूपानें त्यांना असा मिळाला कीं त्यांचे विद्यार्थी त्यांना वडिलासमान लेखीत. साक्रेटिसाच्या शिष्यमंडळींत युक्लिद, आरिस्तियस, झेनोफेन, प्लेटोसारखे एकापेक्षां एकेक हिरे आहेत, तर आगरकरांची शिष्यशाखा कांहीं कमी वजनदार नाहीं. रा. माधव हरि मोडक अगर ह. प. पांगारकर अशीं व्यासभिन्नमतांच्या टोंकांवरील माणसेंही आगरकरांच्याबद्दल कृतज्ञतेचें अश्रु गाळतात, आणि प्रमुख गोविंदराव भाटे कर्तेसुधारक म्हणून गाजलेले आहेत. शाळेच्या चारभिंतींतील शिष्यांविषयीं ही गोष्ट झाली, पण आगरकरांच्या लिखाणानें स्फूर्ति मिळालेले धोंडो केशव कर्वे आगरकरांच्या शिकवणीचा झेंडा किती उंच फडकवीताहेत हें सांगण्याची जरूर नाहीं. इतकेंच काय, पण त्रिखंड कीर्ति दुमदुमवून आलेले नामदार गोखले पूर्वाश्रमीं

आगरकराचेपासून स्वदेशसेवेची स्फूर्ति मिळालेले होते, हें लक्षांत आल्यावांचून रहात नाहीं.

साक्रेटिसआगरकरांच्या शिकवणीची ही सुंठ-साखर दृष्टीस पडावयास, त्यांना स्वतांला लोखंडाचे चणे पचवावयास लागले. तरुण पिढीला बिघडविण्याच्या अपवादावरून लोकांची जळफळ आणि शिव्याशाप यांचा वर्षाव तर साक्रेटिसआगरकांना आनंदानें सहन करावा लागलाच; पण शिवाय आपल्या प्रामाणिक मताबद्दल आगरकरांना आपली प्रेतयात्रा निघालेली पहावी लागली आणि साक्रेटिसाला हेम्लाकसारखें हालाहल प्राशन करावें लागलें.

हे सोहळे बेहोष आनंदानें दोघांनींही करून घेतले. सत्याच्या अभंग पायावर दोघांच्याही ध्येयाची उभारणी झाली होती, त्यामुळें त्यांचीं हृदयें म्हणजे जातीवंत नीतिधैर्याचे अथांग सागर होते. व्यावहारिक ज्ञानावर दोघांच्याही शिकवणीचा भर असल्याकारणानें बाजारबाटगेपणा त्यांच्या सावलीलाही उभा रहात नसे. " ज्याप्रमाणें साक्रेटिसानें आपल्या मोहक वाणीनें व वक्तृत्वानें जनमतावर छाप बसविली

त्याचप्रमाणें आगरकरांनीं आपल्या चटकदार लेखन-कौशल्यानें लोकसमाजावर छाप बसविली. " आणि म्हणूनच रूढिप्रियतेच्या व परंपरेच्या संतापांत तेल पडत गेल्याचा अनुभव आला. तथापि दोघांना इष्ट असलेली कर्तव्यजागृती जमीनीवर आपटलेल्या चेंडूप्रमाणें उसळून यावयाची राहिली नाहीं. कारण साक्रेटिसाच्या वाणीप्रमाणें आगरकरांच्या लेखणींत तर्कानें तत्त्व शोधून काढण्याची बुद्धि आणि वक्तृत्वशक्ति हे गुण कमालीचे वसत होते. मंडळींत बसले असतां दोघेही उल्हासवृत्ति, रसिक व विनोदी असल्याची साक्ष ताबडतोब पटे. पण नेहमीं जिभेवरच भिस्त ठेवून आपला कार्यक्रम चालविणाऱ्या साक्रेटिसापेक्षां, दम्यामुळें मंडळींत फारकरून वक्तृत्व न गाजविणाऱ्या आगरकरांस त्या वृत्तीचा फायदा अजीं झाला नाहीं. साक्रेटिसाबद्दलचे गैरसमज दूर होण्यास त्या वृत्तीचा जसा एक फायदा झाला त्याप्रमाणें स्वतांस झालेली स्फूर्ति " डीमन " नावाच्या यक्षाकडून झाल्याचें साक्रेटिस सांगत असे त्याचाही फायदा श्रद्धाळू वातावरणांत झाल्याविना राहिला नाहीं. याबाबत आगरकरांची

पेठच अगदीं निराळी पडते. सदसद्विवेकबुद्धि त्याची स्फूर्तिमाता आणि सुधारणेचा वाण पाश्चिमात्य ! त्यामुळें सर्वथैव 'आपलेंपण' दाखविणारा साक्रेटिस रूढिप्रिय जगाला अंतःकरणातल्या अंतःकरणांत तरी जितका जवळचा भासावयाचा, तितकी प्रतिष्ठा तरी परक्या सुधारणेचें कलम हिंदी संस्कृतीवर करूं चाहणाऱ्या आगरकरांच्या वाट्यास एकदम कोठून येणार ? अशा स्थितींत, लोकांवर वचक बसावयास कांहीं अमोघ उपयोगीं पडलें असेल तर निष्कलंक चारित्र्य. आकाश कोसळून पडो, आपलीं विवेकप्रधान मतें न सोडण्याचा दृढनिश्चय आणि दांडगी सहनशीलता या त्या निष्कलंक चारित्र्याच्या चमकदार धारा. या कायम ठेवावयाच्या ह्मणजे धनाचे दावेदार होऊन दारिद्र्याला दोस्त बनवावें लागतें. साक्रेटिसआगरकरांनीं हा खरा सागर आचमनासारखा पचनीं पाडला होता. 'देवाचा धर्म' पाळला जावा ह्मणून आपलें कर्तव्य करीत असतां साक्रेटिस, आणि कर्तव्याकरितां कर्तव्य बजावित असतां आगरकर मनाला स्पष्ट वाटेल तें खडखडीत बोलावयास डगमगत

नसत. तथापि लोकप्रवृत्ति लक्षात घेऊन आपल्या शाब्दिक हल्ल्याची लपेट फिरवण्यात साक्रेटिसाचा हात जसा सफाईदार तसा आगरकरांचा नव्हे. विरुद्धपक्षाविषयीं न्यायबुद्धि दोघांच्याही जवळ, पण साक्रेटिसाचा विनय इतक्या अतिरेकाला गेलेला कीं स्वतां सर्व जगातील ज्ञानकोश असता अज्ञानाचें सोंग घेऊन तो आपलें कार्य साधी; आगरकरांचें तसें नव्हतें ! प्रतिपक्षाच्या पदरांत पुरेपूर माप घालण्यासाठीं ते जितक्या तिथें आणि जितक्यास तितकें टणकावित.

खासगी व्यक्ति ह्मणून तर साक्रेटिसआगरकरां-इतकें साम्य क्वचितच आढळेल. दोघेही सोशिक होते, निर्भय होते, प्रेमळ होते, दोघांसही दांभिकपणाची आणि कर्मठपणाची चीड होती, परो-पकारासाठीं, लोकहितासाठीं, लोकशिक्षणासाठीं स्वार्थावर काठी लावून " ब्रह्मानंदीं लागली टाळी, कोण देहातें सांभाळी " अशी साधुवृत्ति दोघांनींही धरली होती. उत्कृष्ट मित्र, सज्जन गृहस्थ, आणि जातिवंत देशभक्त या नात्यांनीं तर त्यांनीं जगाला उदाहरण घालून दिलें आहे. आपल्या हयातकामा-

संबंधीं तर, न्यायमूर्ति रानडयांच्या शब्दांत सांगा-वयाचें झाल्यास साक्रेटिसआगरकरांना असा बळकट विश्वास असावा असें दिसतें कीं,—

" सुधारणा पाहिजे आहे ती स्वतां लोकांतच पाहिजे आहे; हृदयाची, मेंदूची, आत्म्याची सुधारणा झाली पाहिजे. आत्मसात् झालेल्या त्यांच्या पूर्वग्रहांचें उच्चाटन झालें पाहिजे; त्यांच्या मोळ्या-भाबड्या समजुतींची बोळवण होऊन धीरवृत्तिला दणगटपणा आला पाहिजे; कमीपणा म्हणून कसा तो उरतांच कामा नये. खरोखर त्यांचें चारित्र्यच पुन्हा असें बनावयास पाहिजे कीं कालचक्राशीं—युगचैतन्याशीं त्यांचें तेंव्हाच सूत जमेल."

[ The thing to be reformed is their ownself, heart and head and soul, their own prejudices were to be rewared, superstitions to be eradicated, their courage to be strengthened, their weaknesses to be conquered, in fact, their character to be formed again so as to suit the times, so as to fit with the spirit of the age. ]

सातारा जिल्ह्यांतील सर्वांत जुनें

व

सर्वांत नवें पत्र काय म्हणतें ?

# शाळा सोडल्यार

श्री. पु. पां. गोखले यांचें कऱ्हाड येथील विद्यार्थ्यांस दिलेलें व्याख्यान. त्यांत स्फूर्तिदायक उपदेश केलेला आहे. ( शुभसूचक ) शाळा सोडल्यावर विद्यार्थी किंकर्तव्यमूढ, ऐदी, व निष्क्रीय बनतात. त्यांनीं तसें न बनता आपल्याविषयीं आणि आपल्या देशबांधवांविषयीं काय कर्तव्यें करावींत या विषयींचें उत्तम विवेचन यांत आहे. शाळा सोडलेल्या आणि न सोडलेल्याहि विद्यार्थ्यानें हें पुस्तक एकदा अवश्य वाचावें. ( हंस )

# न्यायमूर्ति व आगरकर.

पु. पां. गोखले, कऱ्हाड.

क्रौंचदांपत्याला पाहून वाल्मीकीनें रामायण रामावताराआधीं रचलें. पौर्वात्य व पाश्चिमात्य इतिहासाच्या व संस्कृतीच्या अभ्यासानें भारताची भाग्यशाली भवितव्यता न्यायमूर्तींनीं आपल्या दिव्य दृष्टीनें पाहिली; इतकेंच नव्हे, तर त्या भाग्याच्या लायकीची सर्वांगीण तयारी होण्यासाठीं चोहोंबाजूंनीं सुरवात करून अधुनिक भारताचे आद्याचार्य ही पदवी प्राप्त करून घेतली. न्यायमूर्तिंनीं प्रतिपादन केलेल्या सामाजिक सुधारणेस अत्यंत अवश्यक अशा पाश्चात्य संस्कृतीच्या मराठी भाष्यकाराचें काम आगरकरांनीं केलें. या गोष्टी लक्षात घेतल्या तर रानडे आगरकरांची तुलना म्हणजे महासागर व उपसागर किंवा बोट व कॅबिन यांचीच तुलना म्हणण्याची पाळी येईल.

तें कांहीं असलें तरी, महाराष्ट्रांत आगरकरांची कामगिरी झाली नसती, तर रानड्यांच्या राष्ट्रीय उत्थापनाची तेवढी बाजू कितीतरी लंगडी पडती !
"With the liberated manhood, with buoyant hope, with a faith that never shirks duty, with a sense of justice that deals fairly to all, with unclouded intelletect & lastly with a love that overleaps all bound renovated India will take her proper rank among the nations of the world & be the masters of the situation & of her own destiny."
न्यायमूर्तींच्या या उद्गारांपेक्षां आगरकरांना अगर त्यांच्या भक्तांनाही सामाजिक सुधारणेचें कोणतें दुसरें ध्येय होतें ? अर्थात् रानड्यांना हव्या असलेल्या सामाजिक सुधारणेपायीं आपला जीव लावणारा खंदा वीर ह्मणून आगरकरांनीं जी कामगिरी केली ती रानड्यांच्या दृष्टीनेंही कमी महत्त्वाची नव्हती. लोकमान्यांनीं ह्मटल्याप्रमाणें "परिस्थितीचा गुलाम न बनतां परिस्थितीला यथासंभव, यथाशक्ति व यावच्छक्य आपल्या ताब्यांत आणण्यास जो मनोनिग्रह, स्वार्थत्याग, निर्लोभीपणा आणि धैर्य

लागतें, तें ज्यांच्या अंगांत आहे; आणि दुःखाची अथवा संकटाची भीति अगर पर्वा न बाळगतां जो आपल्याठायीं असणाऱ्या या सद्गुणांचा लोकोपयोगार्थ उपयोग करतो तोच मोठा म्हणावयाचा. गोपाळराव आगरकर हे या कोटींतले होते. ” ही जाणीव रानड्यांनाही होती आणि म्हणूनच रानड्यांनीं पुनर्विवाह न करतां कुमारिकेशीं लग्न लावलें तेव्हां अगर पंचहौदमिशनप्रकरणीं रानड्यांनीं प्रायश्चित्त घेतलें तेव्हां, आगरकरांनीं आपलें प्रखर टीकास्त्र सोडलें असतांही, रानड्यांचा लोभ रतिभर कमी झाला नाहीं. उलट ‘मेसनच्या हातच्या भाताचें’ प्रकरण टिळकआगरकरांत धुमसत असतांना, “ आगरकरांनीं टिळकांची माफी मागावी; कारण त्यायोगें टिळकांसारखें विद्वद्रत्न त्यावेळीं शंकराचार्यांपुढें चाललेल्या पुनर्विवाह विवादांत मंडनपक्षास मिळण्याचा संभव. ” असा हट्ट रानड्यांनीं आपुलकीच्या वडीलपणानें धरला आणि आगरकरांनीं तो पुरवला.

रानड्यांच्याबद्दलचा आपुलकीचा आदर त्यांच्यावर टीकास्त्र सोडतांनाही आगरकरांना टाकवत नसे.

यहाप्रामण्यप्रकरणीं आगरकर लिहितात— "राव-बहादूर इतर सरकारी नोकरांप्रमाणें केवळ एक सरकारी नोकर आहेत, अलिकडील सुशिक्षित लोकांनीं उघडपणें त्यांस आपलें अग्रणीत्व दिलेलें नाहीं हें जरी खरें आहे, तरी आपली नोकरी उत्तम रीतीनें बजावून सांपडेल तेवढया अवकाशांत, राज-कीय धार्मिक व सामाजिक गोष्टींत आपल्या देशाचें पाऊल पुढें पडण्यासाठीं गेलीं वीस पंचवीस वर्षें खाजगी रीतीनें ते जी जीवापाड मेहनत करीत आहेत तांमुळें हे चालू पिढीचे पुढारी असा स्वाभाविक समज झाला आहे. अशा रीतीनें लोका-प्रणीत्वाप्रत पावलेल्या असामान्य पुरुषाच्या वर्त-नाची प्रसंगविशेषीं बरीच चर्चा व्हावी, यांत विशेष आश्चर्य करण्यासारखें कांहीं नाहीं. कारण, ज्याची विद्वत्ता, ज्याचे विचार, ज्याचें आचरण, ज्याचें बुद्धिसामर्थ्य, ज्याचा स्वभाव वगैरे गोष्टी लोकास चांगल्या माहीत झाल्या आहेत त्याचे अमूक प्रसंगीं अमूक प्रकारचें वर्तन होईल अशी अटकळ लोक बांधतात; आणि त्या अटकळीविरुद्ध त्याचें वर्तन झालें म्हणजे त्यांची निराशा होऊन त्यास तो दोष

देऊं लागतात." न्यायमूर्तींच्यावर टीका करतांना तींचें कारण सादर करण्याची ही आगरकरांची तऱ्हा पाहिली म्हणजे स्पष्टवक्त्या व किंचित् 'खोडसाळ' म्हणून गाजलेल्या आगरकरांना रानड्यांच्याबद्दल अंतःकरणपूर्वक नितान्त आदर वाटत होता हें स्पष्ट होतें व आपलें विद्यालयीन शिक्षण संपविल्यानंतर लोकशिक्षणास स्वताला वाहून घेण्याचा निश्चय कळवून न्यायमूर्तींचा सल्ला टिळकांच्या बरोबर आगरकरांनीं पत्रद्वारा घेतला; आणि रानड्यांनीं राष्ट्रीय उत्थापनासाठीं राष्ट्रीय सामायिक, राष्ट्रीय शिक्षण व राष्ट्रीय प्रार्थनामंदीर यांची आवश्यकता प्रतिपादन केली असतां आपल्या प्रकृत्यनुसार पहिलीं दोन अंगें आगरकरांनीं नेटानें चालविलीं, हें साहजिक वाटतें. फार काय, रानड्यांची गुणशालीनता रागरंगानें माहित असल्यामुळेंच, आगरकरांनीं गोपाळ कृष्ण गोखल्यांना रानड्यांच्या सुपूर्त केलें व भारताचा ग्लॅडस्टन होण्याची अपूर्व संधि देऊन रानड्यांचा गुरुप्रभाव दिगंतरीं गाजविला. यावरून असें समजण्याचें कारण नाहीं कीं रानड्यांच्याबद्दल आदर ठेवून जसे आगरकर

प्रसंगविशेषीं टीका करीत, तसे आगरकरांविषयीं कौतुक असूनही रानडे त्यांना फैलावर घेत नसत. ते जरूर घेत. असा सुप्रसिद्ध प्रसंग ह्मणजे १४ मे १८८९ रोजींचा. डेक्कन कॉलेजचें संमेलन होतें. त्यावेळीं भाषण करतांना "ईश्वर नको" वगैरे प्रतिपादन आगरकरांनीं केलें व टिळकांनीं पाठिंबा दिला. तोंच शांतिसागर रानडे रागावले व उसळले कीं– "तुह्मी अलीकडची मंडळी स्पेन्सर व मिल्ल वाचतां आणि तुमची नीतिमत्ता बिघडते!" या वेळींही रानड्यांना परत आहेर मिळाला नसता, असें नाहीं; पण महाजनींनीं आगरकरांच्या नीतिमत्तेची साक्ष भरली व तो मामला टळला.

रानडेआगरकरांच्या आयुष्यांतील हे सार्वजनिक प्रसंग सोडले तर गृहस्थिति, हयात, बुद्धिमत्ता, सांपत्तिक स्थिति, लोकादर, सरकारी मानमान्यता, कीर्ति– कोणत्याही तऱ्हेनें विचार केला तरी रानड्यांच्यापुढें आगरकर ह्मणजे षड्गुणैश्वर्य नारायणापुढें ध्रुवबालक होय. सरकार, समाज, रूढी यांच्याशीं लघुतम विरोधाच्या धोरणानें चालणारे

‘ भले बुद्धींचे सागर ’ न्यायमूर्ती आणि उपरिउल्लखित घटकांशीं वेळप्रसंगीं तुसडेपणानें वागणारे “ चैतन्यसंचारक ” आगरकर या दोहोंचीही गरज राष्ट्राला होती. भांबावलेल्या अर्जुनाला विश्वरूपदर्शनाचा आनंद देणाऱ्या कृष्णाप्रमाणें, हतबुद्ध झालेल्या व निराशेच्या काळोखानें ग्रासलेल्या हिंदुस्थानाला भाग्यशालीपणाचें दर्शन रानडयांच्या द्रष्टपणानें करवलें तर आगरकरांनीं सामाजिक सुधारणेचा जो धूमधडाका उठविला त्यानें हात जोडून बसलेल्या भारताची महाराष्ट्रीय नाडी जिवंतपणाचे तणावे देऊं लागली. तथापि या मोठयाछोटया कामगिरींना मूळ असलेलीं अंतःकरणें बरीक सारखींच विशाल, उदार व निष्पाप होतीं. ही एकच गोष्ट अशी आहे कीं तौलनिक अभ्यासानें येथें कृतज्ञतांजली जोडावी आणि भविष्यानें आपले डोळे आशेनें लावावे. एवढयाचकरतां जग म्हणत असतें कीं धन्य रानडे, धन्य आगरकर, धन्य महाराष्ट्र !

# देशभक्त तात्यासाहेब केळकर.

बुद्धिचातुर्यें महाराष्ट्रीं यशातें विस्तरी ।
हा खरा नरकेसरी ॥ धृ ॥
शोभतो विद्या-कलांनीं शारदाकंठीं हिरा ।
अष्टपैलू साजिरा ॥
नित्य नाचे ज्याचिया रसनेवरी वागीश्वरी । हा खरा०
बाळगी स्वातंत्र्यबाणा लोकमान्यांचा खरा ।
स्वाभिमानी मोहरा ॥
गर्जवी भाषाप्रभुत्वें उग्र भारतकेसरी । हा खरा०
राष्ट्रकार्यीं सव्यसाची योजिली सहकारिता ।
असहकारी तत्वतां ॥
उसळतां स्वातंत्र्यवीचि राष्ट्रनौका सावरी । हा खरा०
वेचितो आयुर्बलादी मातृभूहितचिंतनीं ॥
देहभावें रंगुनीं ॥
धन्य हा लोकाग्रणी ही सार्थ वाटे वैखरी । हा खरा०
दीर्घ-आयुः कीर्ति-विभवें श्रेष्ठ भारतभक्त हा ।
मान्य हो लोकीं महा ॥
पूज्यभावें अर्पिली ही त्याप्रती वनमंजरी ।
स्वीकरा नरकेसरी ॥

# गुरु-शिष्य.



पु. पां. गोखले, कऱ्हाड.

# गुरु-शिष्य.

“ माझ्या देशबांधवांच्या आकांक्षांना मी मर्यादाच मानीत नाहीं. ” नामदार गोखल्यांनीं जातीवन्त देशभक्तीचे हे मनमोकळे उद्गार काढले. पण राष्ट्रसभेकडून स्वातंत्र्यप्राप्तीचें एकमुखी ध्येय महात्मा गांधींनीं जगापुढें जाहीर केलें. प्रभुनें मनांत आणावें आणि सृष्टीनें स्वरूप शृंगारावें, अशी स्थिती गुरु-शिष्य ह्मणून मानले गेलेल्या गोखले-गांधी या भारतसेवकांची आहे. ‘ राजकारणाला अध्यात्माचा रंग चढला पाहिजे ’ ही गोखल्यांची तळमळ, तर ‘ वारांगनेव नृपनीतिरनेकरंगा ’ भारतातच नव्हे तर साऱ्या जगांत अजून असतांना महात्मा गांधींनीं तिला आपल्या परी संतकान्हुपात्रा करून सोडायाला कमी केलें नाहीं. सत्याग्रह आणि अहिंसा यांचे अध्यात्मिक अर्थ चिकित्सक व सूक्ष्म बुद्धिला बसवतां येतील तितके तिनें बसवावे, आणि

गांधींच्या गेल्या दशकांतील राजकारणाचा कस त्यांवर लावावा; ह्मणजे पटेल कीं, धनप्रधान पाश्चिमेची व ऋणप्रधान पूर्वेची, अशा संस्कृती आप आपलें पाणी एकमेकींवर उडवूं लागतांच जी रंगपंचमी साजरी होते, तींत अध्यात्मावर अधिष्ठित झालेल्या पूर्वेच्या संस्कृतीलाच विजयविलासिनी ह्मणून मिरवण्याचें भाग्य गांधींच्या हस्तें लाभत असतें. तरवारीनें साम्राज्यें कमावतां, राखतां व तळपवतांही येतात; पण साम्राज्यशाहीच्या डोक्यावर आणि ह्मणूनच तिच्या बहिणी ज्या वतनदारी, भांडवलशाही व दिमाखशाही त्यांच्याही डोक्यावर, स्वताच्याच हातांतील तलवारी डायोनिसीअसच्या तलवारीसारख्या नंग्या लटकत असतात. यांत्रिक युगाची विश्वामित्री सृष्टी आजकाल घटोत्कची बाजाराचा अनुभव चाखूं लागली आहे आणि मयासुरानें निर्माण केलेल्या पांडवप्रासादांत दुर्योधनाची जशी हरवक्त फटफजिती होत राहिली तशीच आज केवळ उपभोगरतांची अवस्था होत असून, मानसिक शांतिसमुद्राचा दिवसेंदिवस मरुप्रदेश होऊं पहात आहे. अशा वेळीं स्वामी विवेकानंदांनीं

ह्मटल्याप्रमाणें वेदान्तधर्माची अगर गीताधर्माची दीक्षा जर पश्चिमेला मिळेल आणि हिंदुस्थान आपल्या संस्कृतीनिशी अभ्युदयाचा राजरस्ता आक्रमील तर-तर गेल्या महायुद्धांतील डोळे फिरवणाऱ्या नरमेधाला कंटाळून आपआपले हातपाय आवरते घेऊं ह्मणणाऱ्या जगाला जें शांतियुग हवें आहे, तें लाभूं शकेल. भारतीय संस्कृतीच्या गंगेनें इस्लामी संस्कृतीची सरस्वती आपल्यांत मिळवून घेतली, तशीच पाश्चिमात्य संस्कृतीची यमुनाही सम-रस करून घेतली तरच भारतवर्षांचें नष्टचर्य कायमचें संपेल असें गोखल्यांचे गुरु न्या. रानडे ह्मणत. पण नारायणनामापुरताच नारदाला गुरु करून स्वतांच्या दिव्योपभोगांनीं प्रल्हादानें ज्याप्रमाणें खांबांतून परमेश्वराला प्रगट व्हावयास लावलें, त्याप्रमाणेंच भारतोन्नतिचा निजध्यास व राजकारणाचें आध्यात्मीकरण यांची स्फूर्ति गोखल्यांकडून घेऊन महात्मा गांधींनीं आपल्या सत्याग्रहानें जगाच्या शांतियुगाची अरुणप्रभा फाकवण्याचा चमत्कार करून दाखवला आहे. २० व्या शतकाचा ख्रिस्त

ह्मणून पश्चिमेकडील बुद्धिसागर महात्माजींना जो मान देतात त्यांतील रहस्य दुसरें काय बरें आहे ? पीठाचें पाणी दूध ह्मणून देणाऱ्या आईला बाजूला सारून उपमन्यूनें क्षीरसागर मिळवला, त्याचप्रमाणें गोखल्यांच्या भारतसेवकसंस्थेच्या अध्यक्षपदाला व सभासदत्वाला आदरपूर्वक प्रणाम करून महात्मा गांधींनीं आपल्या कर्तबगारीचा आकाशपट उभारला, हें शिष्यापासून पराभवाची इच्छा करणाऱ्या गुरुच्या सात्विक अंतःकरणाला तरी अभिमानास्पदच वाटेल. परतंत्र हिंदुस्थानचे ग्लॅडस्टन ह्मणून ब्रिटिश साम्राज्यभर गुरु गाजले, तर आगामी शांतियुगाचे ध्वजधारक या नात्यानें स्वातंत्र्योन्मुख हिंदुस्थानचे महात्मा ह्मणून शिष्य दुनियेभर दुमदुमले. हें दृश्य रमणीय तसेंच वंदनीय नाहीं काय ?

"राजनैतिक क्षेत्रमें गोखलेनें जीतेजी जैसा आसन मेरे हृदयमें जमाया और जो उनके देहान्तके बाद अबभी जमा हुआ है वैसा फिर कोई न जमा सका" (आत्मकथा अ. २८) महात्माजींची ही हृदयवाहिनी औपचारिक विनयशीलतेची नाहीं. फिरोजशहांना हिमालय व लोकमान्यांना

सागर संबोधणारे महात्माजी "गोखले गंगा की तरह मालुम हुए, उसमे मै नहा सकता था" असा निर्वाळा देतात. तेव्हां 'हृदयाशीं हृदय मिळण्याइतकीं' एकस्वरूप स्पंदनेंही मूळ मनोवृत्तींतच असलीं पाहिजेत यांत शंका कसली? 'निमित्तमात्र भव सव्यसाचिन्' असें भगवन्तानीं अर्जुनाला सांगितलें, त्याचप्रमाणें संसिद्ध शिष्यही गुरुशी वागत असतो. तथापि गुरुशिष्यांची एकजीव मिळणी व्हायलाच पाहिजे व ती तशी व्हायला मूर्तीची मूळ मूसही एकच हवी. तसें नसतें तर तुकारामबोवांनीं छत्रपतींना समर्थांकडे बोट दाखविलें, या इतिहासाला कांहीं अर्थच राहता ना! गोखलेगांधीमध्येंही हृदयवीणेच्या तारा एकसुरी स्पंदन देत. प्रतिपक्षाशीं अगर त्यासंबंधीं बोलतांना सडेतोड बोलावें पण सादर व स्वाभिमानपूर्वक बोलावें; जिभेनें उच्चारलेला वा हातानें लिहिलेला शब्द डोळ्यांनीं धुण्याचा प्रसंग स्वप्नांतसुद्धां येऊं नये; टाकलेलें पाऊल विचारानें खडेखंड असावें, आणि त्यांतूनही घसर झाल्यास ती [illegible]या हृदयानें कबूल

करण्याइतकी हृदयाची बालसुलभता सज्ज राखावी; हातीं घेतलेल्या कामाचा पिच्छा एकनाथाच्या एकनिष्ठेनें पुरवावा व त्यासाठीं वेळ पडल्यास क्यासाब्यांकाचा कस दाखवावा; पतितांच्या पावनतेसाठीं झटावें —गोखलेगांधींच्या चरित्रगंगांचें पाणी पारखतांना असें एकजिनसी दिसतें यांत शंकाच नाहीं. मात्र, गोखले ह्मणजे उगमाजवळची, तर गांधी ह्मणजे बहुजनसमाजाची तारवें वाहणारी सागरमाप बहुमुखी गंगा होय, हें अभ्यासू दृष्टींतून चुकत नाहीं.



मुद्रक व प्रकाशकः—

डॉ. ना. पां. कोल्हापुरे,

श्रीलक्ष्मी प्रेस, कऱ्हाड.

मुद्रक

व

प्रकाशक

डॉ. ना. पां. कोल्हापुरे

श्रीलक्ष्मी प्रेस,

कऱ्हाड.